२०१५०६१५१११८७२२५०१९

**नवीन अविभाज्य शर्तीने दिलेल्या इनाम/ वतन (महार वतन व देवस्थान इनाम जमीन वगळून) जमिनी ज्या की भोगवटादार वर्ग-२ च्या आहेत, त्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगीने / परवानगीशिवाय पूर्वीच शेतीकारणाकरिता हस्तांतरीत झाल्यास असे हस्तांतरण नियमानुकूल करुन भोगवटादार वर्ग-१ करण्याबाबत.**

---

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : वतन २००२/प्र.क्र.१००/ल-४
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७ जुलै, २००८.

वाचा : शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक वतन १०९९/प्र.क्र.२२३/ल-४, दिनांक ९.७.२००२.

**<u>प्रस्तावना :-</u>**

महाराष्ट्र अधिनियम, २१/२००२ ची अंमलबजावणी दि.६.५.२००२ पासून करण्यात आलेली आहे. उक्त सुधारणा अधिनियम प्रत्यक्षात दि. ६.५.२००२ पासून अंमलात आला आहे. या अधिनियमात असे ही स्पष्ट करण्यात आले होते की, यापुढे (महार वतन वगळून) ज्या नवीन व अविभाज्य शर्तीवर धारण केलेल्या वतन जमिनी (महार वतन जमीन वगळता) आहेत, अशा जमिनींची कृषिक प्रयोजनासाठी विक्री करण्याकरिता शासनाची वा सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगीची आवश्यकता नाही. मात्र अशा विक्रीमुळे जमिनीचे हस्तांतरण झाले असले तरी, जमीन धारण करणारा भोगवटादार वर्ग-२ म्हणून धारण करील अशी सुधारणा केलेली आहे.

उक्त सुधारणा अधिनियम दिनांक ६.५.२००२ अंमलात आला आहे. हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकानंतर कृषिक प्रयोजनासाठी होणाऱ्या हस्तांतरणात, अवलंबावयाची कार्यपध्दती तसेच उक्त सुधारित अधिनियम अस्तित्वात आल्यानंतर अशा जमिनीचे हस्तांतरण कृषितर प्रयोजनासाठी झाले असल. अशी पूर्वपरवानगी शिवाय झालेली हस्तांतरणे, नियमानुकूल करण्यासाठी काय कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी याचीही तरतूद उक्त सुधारणा अधिनियमात करण्यात आली आहे.

तथापि, उक्त सुधारणा अधिनियम अस्तित्वात येणेपूर्वी कृषिक प्रयोजनासाठी जी हस्तांतरणे विनापरवानगी झालेली आहेत व ज्या हस्तांतरणांचा अंमल अधिकार अभिलेखात घेण्यात आलेला नाही, अशी हस्तांतरणे कशी नियमानुकूल करावीत यासाठी उक्त सुधारणा अधिनियमात कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. परिणामी उक्त सुधारणा अधिनियम अस्तित्वात येण्यापूर्वी कृषिक प्रयोजनासाठी जी विनापरवानगी हस्तांतरणे झाली आहेत, अशा प्रकरणी, अशा जमिनी खरेदीदाराच्या प्रत्यक्ष ताब्यात आहेत, तथापि अधिकार अभिलेखात खरेदीदाराचे नाव नोंदलेले नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे अशा व्यक्तींना त्यांची नावे अधिकार अभिलेखात नसल्यामुळे, शासकीय योजनांचा लाभ घेता येत नाही. तसेच अन्य अनेक स्वरुपाच्या व्यावहारिक अडचणींनाही सामोरे जावे लागते.

<u>शासन निर्णय :-</u> यावर विचार करुन शासनाने आता निर्णय घेतला आहे की,

(१) महाराष्ट्र अधिनियम क्र.२१/२००२ हा अमलात येण्याच्या दिनांकापूर्वी ज्या वतन/ ईनाम जमिनींची (महार वतन जमिनी व देवस्थान इनाम जमिनी वगळता) सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीशिवाय कृषिक प्रयोजनासाठी हस्तांतरणे झाली आहेत व अशा हस्तांतरणाच्या नोंदी अधिकार अभिलेखात घेण्यात आलेल्या नाहीत, अशा जमिनींच्या नोंदणीकृत हस्तांतरणाबाबतचा पुरावा (नोंदणीकृत खरेदीखत, नोंदणीकृत बक्षीसपत्र इ.) खरेदीदाराने सादर केल्यास असे व्यवहार नियमानुकूल करण्यात यावेत. (असे करताना अशा जमिनींचे यापूर्वी झालेले कृषिक प्रयोजनासाठीचे सर्व विनापरवानगी व्यवहार एक खास बाब म्हणून दुर्लक्षित करण्यात यावेत)

(२) अशी हस्तांतरणे नियमानुकूल करुन दिल्यानंतरही या जमिनी भोगवटादार वर्ग-२ या सत्ता प्रकारानेच धारण करण्यात येतील व या जमिनीच्या त्यापुढील हस्तांतरणास महाराष्ट्र अधिनियम क्र.२१/२००२ च्या तरतुदी लागू होतील.

(३) वरील सुधारणा महार वतन जमिनी व देवस्थान ईनाम जमिनींना लागू होणार नाहीत.

(४) सोबत सन २००८ च्या अधिनियम १९ च्या दोन प्रती (मराठी/इंग्रजी) जोडल्या आहेत.

सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना विनंती करण्यात येते की, सदर तरतुदीच्या अंमलबजावणीच्या संदर्भात संबंधितांना आवश्यक त्या सूचना दयाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

(रमाकान्त असमर)
सहसचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त,
२) सर्व जिल्हाधिकारी,
३) जमाबंदी आयुक्त संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,
४) नोंदणी महानिरीक्षक, मुद्रांक विभाग, पुणे,
५) सर्व उपविभागीय अधिकारी,
६) सर्व तहसिलदार,
७) निवड नस्ती ल-४ कार्यासन, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई.

H - 1378 - 10

असा. क्र. २४

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, मे ९, २००८/वैशाख १९, शके १९३०**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.**—मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५०, मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५३, मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत अधिनियम, १९५५, मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) अधिनियम, १९६२ यांत आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम | २४४-२४८ |

दिनांक ७ मे २००८ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

**सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ९ मे २००८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५०, मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५३, मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत अधिनियम, १९५५, मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) अधिनियम, १९६२ यांत आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५०, मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५३, मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत अधिनियम, १९५५, मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) अधिनियम, १९६२ यांत आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकोणसाठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— १९५० चा मुंबई ६०. १९५३ चा मुंबई ७०. १९५५ चा मुंबई २२. १९५९ चा मुंबई १. १९६२ चा महा. ३५.

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत, मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत, मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत, मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) (सुधारणा) अधिनियम, २००८ असे म्हणावे.

प्रकरण दोन

**मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५० याची सुधारणा.**

सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ४ ची सुधारणा. **२.** मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५० याच्या कलम ४ च्या पोट-कलम (२) याच्या प्रथम परिच्छेदाला त्याचा खंड (अ) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या खंड (अ) नंतर, परंतु पहिल्या परंतुकापूर्वी पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— १९५० चा मुंबई ६०.

" (ब) प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, भोगवटादाराने जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा कोणत्याही इतर प्राधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय किंवा ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय अशा कोणत्याही भोगवट्याचे कृषिसंबंधी प्रयोजनासाठी आधीच हस्तांतरण केले असेल तर, अशा हस्तांतरणाचा पुरावा म्हणून त्याचे विक्री खत, बक्षीसपत्र, इत्यादींसारखे नोंदणीकृत संलेख सादर केल्यानंतर असे हस्तांतरण नियमित करता येईल. असे हस्तांतरण नियमित करण्यात आल्यानंतर, अशा जमिनीचा भोगवटा संहितेच्या तरतुदींनुसार, अशा हस्तांतरिती भोगवटादाराकडून नवीन व अविभाज्य शर्तींवर (भोगवटादार वर्ग दोन) धारण करण्यात येईल : ".

प्रकरण तीन

**मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५३ याची सुधारणा.**

सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७० याच्या कलम ५ ची सुधारणा. **३.** मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५३ याच्या कलम ५ च्या, पोट-कलम (३) याच्या प्रथम परिच्छेदाला त्याचा खंड (अ) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या खंड (अ) नंतर, परंतु पहिल्या परंतुकापूर्वी पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— १९५३ चा मुंबई ७०.

"(ब) प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, भोगवटादाराने जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा कोणत्याही इतर प्राधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीशिवाय किंवा ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय अशा कोणत्याही भोगवट्याचे कृषिसंबंधी प्रयोजनासाठी आधीच हस्तांतरण केले असेल तर, अशा हस्तांतरणाचा पुरावा म्हणून त्याचे विक्री खत, बक्षीसपत्र, इत्यादींसारखे नोंदणीकृत संलेख सादर केल्यानंतर असे हस्तांतरण नियमित करता येईल. असे हस्तांतरण नियमित करण्यात आल्यानंतर अशा जमिनीचा भोगवटा संहितेच्या तरतुदींनुसार, अशा हस्तांतरिती भोगवटादाराकडून नवीन व अविभाज्य शर्तीवर (भोगवटादार वर्ग दोन) धारण करण्यात येईल : ".

प्रकरण चार

## मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत अधिनियम, १९५५ याची सुधारणा.

१९५५ चा मुंबई २२.

**४.** मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत अधिनियम, १९५५ (यात यापुढे या अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ६ मधील, दुसऱ्या परंतुकामध्ये,— सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ६ ची सुधारणा.

(क) "परंतु आणखी असे की, मुंबई परगणा" या मजकुराऐवजी, "परंतु आणखी असे की, (अ) मुंबई परगणा" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) शेवटी, खालील मजकूर जादा दाखल करण्यात येईल :—

"; आणि (ब) प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, भोगवटादाराने जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा कोणत्याही इतर प्राधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय किंवा ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय अशा कोणत्याही भोगवट्याचे कृषिसंबंधी प्रयोजनासाठी आधीच हस्तांतरण केले असेल तर, अशा हस्तांतरणाचा पुरावा म्हणून त्याचे विक्री खत, बक्षीसपत्र, इत्यादींसारखे नोंदणीकृत संलेख सादर केल्यानंतर असे हस्तांतरण नियमित करता येईल. असे हस्तांतरण नियमित करण्यात आल्यानंतर, अशा जमिनीचा भोगवटा संहितेच्या तरतुदींनुसार, अशा हस्तांतरिती भोगवटादाराकडून नवीन व अविभाज्य शर्तीवर (भोगवटादार वर्ग दोन) धारण करण्यात येईल : ".

**५.** उक्त अधिनियमाच्या कलम ७ च्या पोट-कलम (३) याच्या प्रथम परिच्छेदाला त्याचा खंड (अ) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या खंड (अ) नंतर, परंतु पहिल्या परंतुकापूर्वी, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ७ ची सुधारणा.

"(ब) प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, भोगवटादाराने जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा कोणत्याही इतर प्राधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीशिवाय किंवा ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय अशा कोणत्याही भोगवट्याचे कृषिसंबंधी प्रयोजनासाठी आधीच हस्तांतरण केले असेल तर, अशा हस्तांतरणाचा पुरावा म्हणून त्याचे विक्री खत, बक्षीसपत्र, इत्यादींसारखे नोंदणीकृत संलेख सादर केल्यानंतर असे हस्तांतरण नियमित करता येईल. असे हस्तांतरण नियमित करण्यात आल्यानंतर, अशा जमिनीचा भोगवटा संहितेच्या तरतुदींनुसार अशा हस्तांतरिती भोगवटादाराकडून नवीन व अविभाज्य शर्तीवर (भोगवटादार वर्ग दोन) धारण करण्यात येईल : ".

## प्रकरण पाच

## मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५८ याची सुधारणा.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**६.** मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५८ याच्या कलम ५ च्या पोट-कलम (३) याच्या प्रथम परिच्छेदाला त्याचा खंड (अ) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या खंड (अ) नंतर, परंतु पहिल्या परंतुकापूर्वी, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— १९५९ चा मुंबई १.

" (ब) प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, भोगवटादाराने जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा कोणत्याही इतर प्राधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीशिवाय किंवा ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय अशा कोणत्याही भोगवट्याचे कृषिसंबंधी प्रयोजनासाठी आधीच हस्तांतरण केले असेल तर, अशा हस्तांतरणाचा पुरावा म्हणून त्याचे विक्री खत, बक्षीसपत्र, इत्यादींसारखे नोंदणीकृत संलेख सादर केल्यानंतर असे हस्तांतरण नियमित करता येईल. असे हस्तांतरण नियमित करण्यात आल्यानंतर, अशा जमिनीचा भोगवटा, संहितेच्या तरतुदींनुसार अशा हस्तांतरिती भोगवटादाराकडून नवीन व अविभाज्य शर्तीवर (भोगवटादार वर्ग दोन) धारण करण्यात येईल : ".

## प्रकरण सहा

## महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) अधिनियम, १९६२ याची सुधारणा.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**७.** महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) अधिनियम, १९६२ याच्या कलम ५ च्या पोट-कलम (३) याच्या प्रथम परिच्छेदाला, त्याचा खंड (अ) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या खंड (अ) नंतर, परंतु पहिल्या परंतुकापूर्वी, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— १९६२ चा महा. ३५.

" (ब) प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, भोगवटादाराने जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा कोणत्याही इतर प्राधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीशिवाय किंवा ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय अशा कोणत्याही भोगवट्याचे कृषिसंबंधी प्रयोजनासाठी आधीच हस्तांतरण केले असेल तर, अशा हस्तांतरणाचा पुरावा म्हणून त्याचे विक्री खत, बक्षीसपत्र, इत्यादींसारखे नोंदणीकृत संलेख सादर केल्यानंतर असे हस्तांतरण नियमित करता येईल, असे हस्तांतरण नियमित करण्यात आल्यानंतर, अशा जमिनीचा भोगवटा संहितेच्या तरतुदींनुसार, अशा हस्तांतरिती भोगवटादाराकडून नवीन व अविभाज्य शर्तीवर (भोगवटादार वर्ग दोन) धारण करण्यात येईल : ".

## प्रकरण सात
## संकीर्ण

१९५० चा मुंबई ६०. १९५३ चा मुंबई ७०. १९५५ चा मुंबई २२. १९५९ चा मुंबई १. १९६२ चा महा. ३५.

शंका दूर करणे.

८. शंका दूर करण्यासाठी, असे जाहीर करण्यात येत आहे की, या अधिनियमाच्या कलमे २ ते ७ अनुक्रमे मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५०, मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५३, मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत अधिनियम, १९५५, मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) अधिनियम, १९६२ यांमध्ये करण्यात आलेल्या सुधारणा, महार वतन जमिनी व देवस्थान जमिनींच्या संबंधातील भोगवट्याच्या हस्तांतरणाकरिता लागू होणार नाहीत.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

क्र. ४१ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, मे ९, २००८/वैशाख १९, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Paragana and Kulkarni Watans (Abolition), the Bombay Service Inams (Useful to Community) Abolition, the Bombay Merged Territories Miscellaneous Alienations Abolition, the Bombay Inferior Village Watans Abolition and the Maharashtra Revenue Patels (Abolition of Office) (Amendment) Act, 2008 (Mah. XIX of 2008), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT NO. XIX OF 2008.

*(First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette" on the 9th May 2008.).*

An Act further to amend the Bombay Paragana and Kulkarni Watans (Abolition) Act, 1950, the Bombay Service Inams (Useful to Community) Abolition Act, 1953, the Bombay Merged Territories Miscellaneous Alienations Abolition Act, 1955, the Bombay Inferior Village Watans Abolition Act, 1958 and the Maharashtra Revenue Patels (Abolition of Office) Act, 1962.

Bom. LX of 1950. Bom. LXX of 1953. Bom. XXII of 1955. Bom. I of 1959. Mah. XXXV of 1962.

WHEREAS it is expedient further to amend the Bombay Paragana and Kulkarni Watans (Abolition) Act, 1950, the Bombay Service Inams (Useful to Community) Abolition Act, 1953, the Bombay Merged Territories Miscellaneous Alienations Abolition Act, 1955, the Bombay Inferior Village Watans Abolition Act, 1958 and the Maharashtra Revenue Patels (Abolition of Office) Act, 1962, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Fifty-ninth Year of the Republic of India as follows :—

## CHAPTER I

PRELIMINARY.

Short title. **1.** This Act may be called the Bombay Paragana and Kulkarni Watans (Abolition), the Bombay Service Inams (Useful to Community) Abolition, the Bombay Merged Territories Miscellaneous Alienations Abolition, the Bombay Inferior Village Watans Abolition and the Maharashtra Revenue Patels (Abolition of Office) (Amendment) Act, 2008.

## CHAPTER II

AMENDMENT TO THE BOMBAY PARAGANA AND KULKARNI WATANS (ABOLITION) ACT, 1950.

Amendment of section 4 of Bom. LX of 1950. **2.** In section 4 of the Bombay Paragana and Kulkarni Watans (Abolition) Act, 1950, the first paragraph of sub-section (*2*) shall be re-numbered as clause (*a*) thereof, and after clause (*a*) as so re-numbered, but before the first proviso, the following clause shall be inserted, namely :— Bom. of 1

"(*b*) Before the commencement date, if any such occupancy has already, without previous sanction or no objection certificate from the Collector or any other authority, been transferred by the occupant, for agricultural purpose, such transfer may be regularised on the production of registered instruments such as sale deed, gift deed, etc., as a proof thereof, for such transfer. After such regularisation, the occupancy of such land shall be held by such transferee occupant on new and impartiable tenure (Occupant Class II), in accordance with the provisions of the Code :".

## CHAPTER III

AMENDMENT TO THE BOMBAY SERVICE INAMS (USEFUL TO COMMUNITY) ABOLITION ACT, 1953.

Amendment of section 5 of Bom. LXX of 1953. **3.** In section 5 of the Bombay Service Inams (Useful to Community) Abolition Act, 1953, the first paragraph of sub-section (*3*) shall be re-numbered as clause (*a*) thereof, and after clause (*a*) as so re-numbered, but before the first proviso, the following clause shall be inserted, namely :— Bom. of 19

"(*b*) Before the commencement date, if any such occupancy has already, without previous sanction or no objection certificate from the Collector or any other authority, been transferred by the occupant, for agricultural purpose, such transfer may be regularised on the production of registered instruments such as sale deed, gift deed, etc., as a proof thereof, for such transfer. After such regularisation, the occupancy of such land shall be held by such transferee occupant on new and impartiable tenure (Occupant Class II), in accordance with the provisions of the Code :".

## CHAPTER IV

### AMENDMENTS TO THE BOMBAY MERGED TERRITORIES MISCELLANEOUS ALIENATIONS ABOLITION ACT, 1955.

Bom. XXII of 1955. **4.** In section 6 of the Bombay Merged Territories Miscellaneous Alienations Abolition Act, 1955 (hereinafter, in section 5 of this Act, referred to as "the said Act"), in the second proviso,— Amendment of section 6 of Bom. XXII of 1955.

(*a*) for the words "Provided further that, on or after" the words, brackets and letter "Provided further that, (*a*) on or after "shall be substituted ;

(*b*) the following shall be added at the end, namely :—

"; and (*b*) before the commencement date, if any such occupancy has already, without previous sanction or no objection certificate from the Collector or any other authority, been transferred by the occupant, for agricultural purpose, such transfer may be regularised on the production of registered instruments such as sale deed, gift deed, etc., as a proof thereof, for such transfer. After such regularisation, the occupancy of such land shall be held by such transferee occupant on new and impartiable tenure (Occupant Class II), in accordance with the provisions of the Code :".

**5.** In section 7 of the said Act, the first paragraph of sub-section (*3*) shall be re-numbered as clause (*a*) thereof, and after clause (*a*) as so re-numbered, but before the first proviso, the following clause shall be inserted, namely :— Amendment of section 7 of Bom. XXII of 1955.

"(*b*) Before the commencement date, if any such occupancy has already, without previous sanction or no objection certificate from the Collector or any other authority, been transferred by the occupant, for agricultural purpose, such transfer may be regularised on the production of registered instruments such as sale deed, gift deed, etc., as a proof thereof, for such transfer. After such regularisation, the occupancy of such land shall be held by such transferee occupant on new and impartiable tenure (Occupant Class II), in accordance with the provisions of the Code :".

## CHAPTER V

### AMENDMENT TO THE BOMBAY INFERIOR VILLAGE WATANS ABOLITION ACT, 1958.

Bom. I of 1959. **6.** In section 5 of the Bombay Inferior Village Watans Abolition Act, 1958, the first paragraph of sub-section (*3*) shall be re-numbered as clause (*a*) thereof, and after clause (*a*) as so re-numbered, but before the first proviso, the following clause shall be inserted, namely :— Amendment of section 5 of Bom. I of 1959.

"(*b*) Before the commencement date, if any such occupancy has already, without previous sanction or no objection certificate from the Collector or any other authority, been transferred by the occupant, for agricultural purpose, such transfer may be regularised on the production of registered instruments such as sale deed, gift deed, etc., as a proof thereof, for such transfer. After such regularisation, the occupancy of such land shall be held by such transferee occupant on new and impartiable tenure (Occupant Class II), in accordance with the provisions of the Code :".

## CHAPTER VI

### AMENDMENT TO THE MAHARASHTRA REVENUE PATELS (ABOLITION OF OFFICE) ACT, 1962.

Amendment of section 5 of Bom. XXXV of 1962.

7. In section 5 of the Maharashtra Revenue Patels (Abolition of Office) Act, 1962, the first paragraph of sub-section (*3*) shall be re-numbered as clause (*a*) thereof, and after clause (*a*) as so re-numbered, but before the first proviso, the following clause shall be inserted, namely :— Mah. XXXV of 1962.

"(*b*) Before the commencement date, if any such occupancy has already, without previous sanction or no objection certificate from the Collector or any other authority, been transferred by the occupant, for agricultural purpose, such transfer may be regularised on the production of registered instruments such as sale deed, gift deed, etc., as a proof thereof, for such transfer. After such regularisation, the occupancy of such land shall be held by such transferee occupant on new and impartiable tenure (Occupant Class II), in accordance with the provisions of the Code :".

## CHAPTER VII

### MISCELLANEOUS

Removal of doubts.

8. For the removal of doubts, it is declared that, the amendments made by sections 2 to 7 of this Act to the Bombay Paragana and Kulkarni Watans (Abolition) Act, 1950, the Bombay Service Inams (Useful to Community) Abolition Act, 1953, the Bombay Merged Territories Miscellaneous Alienations Abolition Act, 1955, the Bombay Inferior Village Watans Abolition Act, 1958 and the Maharashtra Revenue Patels (Abolition of Office) Act, 1962, respectively, shall not be applicable for the transfer of occupancy in respect of the *Mahar Watan* lands and *Devasthan* lands.

Bom. LX of 1950. Bom. LXX of 1953. Bom. XXII of 1955. Bom. I of 1959. Mah. XXXV of 1962.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई